डॉ. प्रभाकर देसाई
एम.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संदर्भ : रासेयो/२०२२/४३०    दि. ११/०१/२०२२

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : 'युवा सप्ताह' साजरा करणेबाबत

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नियमित कार्यक्रमांतर्गत स्वामी विवेकानंद जयंती निमित्त दि. १२ ते १८ जानेवारी २०२२ दरम्यान राष्ट्रीय सेवा योजना संलग्नीत महाविद्यालयांमध्ये युवा सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. या युवा सप्ताहानिमित्त खालील विषयांवर आधारित कार्यक्रमांतर्गत विविध कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन दूरदृश्यप्रणाली स्वरूपात आपल्या महाविद्यालयामार्फत करण्यात यावे.

१. स्वामी विवेकानंदांचे विचार व आजचा युवक
२. स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानाकरिता युवक
३. वित्तीय साक्षरता अभियान
४. प्लॅस्टीक कचरा निर्मूलन
५. मतदार जनजागृती
६. युवकांची बदलती मानसिकता
७. युवकांमधील वैज्ञानिक दृष्टीकोन
८. कोरोना जनजागृती: माझा गाव कोरोनामुक्त गाव

तरी आपल्या महाविद्यालयामध्ये वरील विषयांवर आधारित कार्यक्रमांचे व चर्चासत्रांचे आयोजन दूरदृश्यप्रणालीद्वारे करून सदर उपक्रम संपन्न झाल्यानंतर उपक्रमाचे फोटो आणि अहवाल nss_student_list@pun.unipune.ac.in या मेलवर सादर करावा.

तसेच मा. क्षेत्रीय संचालक, रासेयो क्षेत्रीय संचलनालय, भारत सरकार, पुणे यांच्या पत्रानुसार दि. १२ जानेवारी २०२२ रोजी, राष्ट्रीय युवा महोत्सवाचे उद्घाटन मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता आभासी पध्द्तीने साजरा होणार आहे. तरी आपण व आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त रासेयो स्वयंसेवक या दूरदृश्यप्रणाली लिंकद्वारे https://pmevents.ncog.gov.in/ सहभागी व्हावे. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना